## “जगावर राज्य हे पुस्तकांचे आहे”........... श्री. अरविंद देशपांडे

बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहिती शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भूतपूर्व माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्य दि. **१८ ऑक्टोबर २०२१** रोजी **राज्यस्तरीय “Online Wachan Prerana Din (वाचन प्रेरणा दिन)**” या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.

या कार्यक्रमासाठी श्री. अरविंद देशपांडे, माजी समन्वयक विस्तार सेवा केंद्र द्वारा श्रीमती पुतळाबेन शहा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सांगली हे प्रमुख वक्ते होते. तसेच या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा.कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्याचे स्वागत डॉ. नमिता खोत, संचालक, बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र यांनी केले. त्यांच्या भाषणात त्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन पटावर माहिती देऊन CEC E- Content या प्रणाली संदर्भात देखील संक्षिप्त माहिती दिली. तदनंतर CEC E- Content या ऑनलाईन वेबसाईट चे उदघाटन मा.कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. प्रमुख पाहुण्याची ओळख डॉ. डी.बी. सुतार, उप-ग्रंथपाल, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र यांनी करुन दिली.

श्री. अरविंद देशपांडे यांनी “वाचनसंस्कृती व नवोपक्रम” या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी त्यांच्या व्याख्यानात ग्रंथालयाचा वापर / ग्रंथपालांचे महत्व व डॉ.कलामांच्या निवडक पुस्तकांवर भाष्य केले. त्याचबरोबर श्री. देशपांडे याच्या जीवनावर झालेला विविध पुस्तकांचा प्रभाव, भारतीय संस्कृती व अनुभव कथन केले. त्यांच्या नवोपक्रमात त्यांनी चालू केलेले विविध कार्यक्रम व उपक्रम यांची माहिती दिली. त्यामध्ये ‘ वाचक परिवार’, ‘ माझ्यावर प्रभाव टाकणारी पुस्तके यांवर निंबध स्पर्धा’, ‘ प्रकट वाचन स्पर्धा’ ,‘पुस्तकांचा परिणाम व कार्यशाळा, ‘स्वरसाधना लेख’ ,‘माझी सासू माझी सुन संवाद कार्यक्रम’ , पुस्तकांवर जाहीर वाचन , कविता /साहित्यिक वाचन कार्यक्रम, पर्यावरण जागृती, विज्ञान कथा लेखन कार्यशाळा, नवलेखन स्पर्धा, माझे बाबांवर लेखन स्पर्धा, सर्वानी वाचावीत अशा निवडक पुस्तकांची नावे, त्यातील मजकूर, इ. वर अनुभवपर मार्गदर्शन केले.

डॉ. पी.एस. पाटील, प्र-कुलगुरू यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. डी. टी. शिर्के यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात CEC च्या माध्यमातून आपल्या विद्यार्थ्यासाठी एक मोठे ज्ञान भांडार उपलब्ध झाल्याचे नमूद केले. लेखक घडविण्यासाठी कसे वाचावे, काय वाचावे, प्रकट वाचन व त्यांची क्षमता / पात्रता याबरोबरच “वाचन, चिंतन, भाषण व लेखन” या चार गोष्टी महत्वाच्या आहेत असे सागितले. वाचन प्रवृत करण्यासाठी, पुस्तक सर्वाना माहित होण्यासाठी व वाचकांची संख्या वाढवण्यासाठी नव्याने प्रकाशित झालेल्या पुस्तकांवर चर्चासत्र, प्रकट वाचन, लेखकांची मुलाखत इ. कार्यक्रमांचे आयोजन ग्रंथपालांनी करावे असे आव्हान केले.

या कार्यक्रमासाठी मा. कुलसचिव, डॉ. व्ही.डी. नांदवडेकर ,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांची प्रमुख उपस्थिती होती व त्याचबरोबर बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रातील सर्व कर्मचारी ,ग्रंथालय व माहिती शास्त्र विभागातील सर्व शिक्षक, संलग्नीत महाविद्यालयातील ग्रंथपाल असे ५० जण उपस्थित होते.

शेवटी कार्यक्रमाचे आभार डॉ. सचिनकुमार पाटील, सहाय्यक प्राध्यापक यांनी केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन . डॉ. युवराज जाधव, सहाय्यक प्राध्यापक यांनी केले.तसेच डॉ. शिवराज थोरात, सहाय्यक ग्रंथपाल यांनी तांत्रिक सहाय्य केले व डॉ. पी. बी. बिलावर, उप-ग्रंथपाल यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये योगदान दिले. कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

Photos 18/10/21


D T Shirke Shivaji University
Unmute
Start video
Share
Participants
Chat


Arvind Deshpande (Cohost)
Unmute
Start video
Share
Participants
Chat


Prof. P. S. Patil PVC (Cohost)
Type here to search


Namita Khot (Cohost)
Mute
Start video
Participants
Chat
Type here to search


Shivaji University, Kolhapur
Barr. Balasaheb Khardekar Knowledge Resource Centre (BBK KRC)
Welcome
INAUGURATION OF URL Link
Provided by Consortium for Educational Communication
(CEC) e-contents For Undergraduate (UG) Students
With the auspicious hands of
Prof. (Dr.) D. T. Shirke
Hon'ble Vice Chancellor
In the Presence of
Prof. (Dr.) P. S. Patil
Hon'ble Pro-Vice Chancellor
Dr. V. D. NANDAVADEKAR
Registrar
Dr. NAMITA KHOT
Director
& Head of Department of Library & Information Science
URL Link : e-contents for Under Graduate Students (CEC)
All BBK KRC - STAFF
Unmute
Start video
Share
Participants
Chat


WEL-COME
ON - LINE INAUGURATION OF
"Inauguration of Link" Provided by
Consortium for Educational Communication (CEC)
e-Contents For UG Students
18th October, 2021 at 3.00 pm on the Occasion of
"Vachan Prerna Din"
Layout
Participants
Chat